REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख २८ एप्रिल १९४८ | अंक १६


## सारस्वत
## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८] सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई



टे. नं. ३१६७५

| | |
|---|---|
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. १,२१,००० |
| ठेवी ... | रु. ७८,७६,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ८५,७०,००० |

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा —

सब-ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

— शेड्यूल्ड बँक —

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | रु. ५०,००,००० |
| खपलेलें भांडवल : | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर भांडवल : | रु. ४,१०,००० |
| एकूण खेळतें भांडवल : | रु. २,००,००,००० |

गतवर्षासाठीं बँकेनें शेअरवर पांच टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे.

—बँकेच्या शाखा—

डेक्कन जिमखाना ( पुणें ), खडकी, मुंबई ( फोर्ट, गिरगांव व दादर ), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर ( पे ऑफिस ), नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर व कल्याण.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २ — चिं. वि. जोग, मॅनेजर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें










वर्कशॉप मशीनरी (२)
हेवी ड्यूटी
शिमोगा लेथ
(८'—१०")
संपूर्ण देशी. पहिल्या प्रतीचा, तज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत् साधनांनीं बनविलेला
— चौकशी स्थान —
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

## विविध माहिती

**शहरांतून हौसिंग सोसायट्यांस चालना**—ऑक्टोबर ते डिसेंबर, १९४७ च्या तिमाहींत मुंबई प्रांतांत २३५ सहकारी सोसायट्या नोंदण्यांत आल्या. खेडेगांवांत १४४ सोसायट्या निघाल्या व शहरांतून ९१ स्थापन झाल्या. त्यांत २७ कंझ्युमर्स व २७ हौसिंग सोसायट्या आहेत. घरांच्या तुटवड्यामुळें हौसिंग सोसायट्यांना चालना मिळालेली आहे. अहमदाबाद येथें हरिजनां साठी एक हौसिंग सोसायटीची स्थापना झाली आहे.

**अ. वि. गृहांत प्रवेश**— गेल्या जानेवारी अखेर पुण्यांत झालेल्या दंगलीमुळें पुणें अनाथ विद्यार्थी गृहाचें अतोनात नुकसान झालें असलें तरी संस्थेनें कांहीं गरजू व आपद्ग्रस्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचें ठरविलें आह. छापील अर्ज पोचण्याची तारीख १० मे आहे.

**पोस्टाचीं नवीं तिकिटें: श्री. भोंसुले ह्यांची सूचना**—पोस्टाच्या तिकिटांवर वेगवेगळ्या स्थळांचीं व व्यक्तींचीं नांवें चित्रित करण्यांत यावींत असें सुचवून त्यांची एक मोठी यादीहि नागपूरच्या सी. पी. अँड बेरार प्री. को. हौ. सोसायटी लि. चे अध्यक्ष श्री. जी. ए. भोंसुले ह्यांनीं तयार केली आहे. अशा तऱ्हेचीं तिकिटें, कार्डें व पाकिटें काढल्यास देशाचें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें उत्पन्न वाढणार आहे; परदेशाचे प्रवासी आकर्षित होऊन येथें येऊन ते पैसा खर्च करतील आणि त्यामुळें हिंदुस्थानाच्या संपत्तींत भर पडेल, असें श्री. भोंसुले ह्यांचें म्हणणें आहे.

**विजय टेक्स्टाइल्सचे नवे चेअरमन**—विजय टेक्स्टाइल्स लि. पुणें ह्या कंपनीचे प्रारंभापासूनचे चेअरमन श्री. बाबासाहेब साळवेकर ह्यांच्या मृत्यूमुळें रिकाम्या झालेल्या चेअरमनचे जागीं कंपनीचे डायरेक्टर श्री. मा. रा. जोशी ह्यांची निवड झाली आहे.

**२¾% १९४८-५२ कर्जाची परतफेड**—हिंदुस्थान सरकार २¾% १९४८-५२ कर्जाची १५ जुलै १९४८ रोजीं परतफेड करणार आहे. त्या तारखेनंतर व्याज बंद होईल. हें कर्ज ३ महिन्यांच्या नोटिशीनें १ जून १९४८ नंतर परत फेडण्याचा सरकारचा अधिकार होता, त्याप्रमाणें ही व्यवस्था होत आहे. हें कर्ज इतक्या लवकर फेडण्यांत येणार नाहीं अशी लोकांची समजूत झाली होती.

**ब्रिटनमध्यें पोलादाचा तुटवडा**—१९४८ सालीं, १९३८ शीं तुलना करतां, १६० टक्के पोलादाच्या मालाची निर्यात करण्याचें ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडनें ठरविलें होतें. परंतु, ह्या निर्यातीच्या उद्यांकांत ⅟₁₀ कपात करण्याचें नुकतेंच ठरविण्यांत आलें. खुद्द ब्रिटनमध्यें शेतीचीं अवजारें, कापडाचीं यंत्रें, इत्यादी माल तयार करण्यासाठी अधिक पोलाद लागू लागल्यानें निर्यातींत वरील प्रमाणें कपात करण्यांत आली आहे.

**कॅनडाशीं डॉलर्समधून देवघेव**—कॅनडापासून ब्रिटन घेत असलेल्या मालाबद्दल ब्रिटन ह्यापुढें पौंडा ऐवजीं डॉलर्स देणार आहे. कॅनडाशीं करावयाच्या व्यापारी देण्या-घेण्या संबंधींचा करार संपल्यामुळें ही नवीन व्यवस्था अमलांत येणार आहे. नव्या व्यवस्थेमुळें ब्रिटनला दर महिन्याला सुमारें १ कोटी, ५० लाख डॉलर्स द्यावे लागतील असा अंदाज आहे.

**पाकिस्तान-हिंदुस्थान रेल्वे वहातूक**—हिंदुस्थानची फाळणी झाल्यापासून पश्चिम पाकिस्तान व हिंदुस्थान मधील रेल्वे वहातूक स्थगित झाली होती. आतां दिल्ली ते लाहोर यांच्या दरम्यान एक एक्सप्रेस गाडी चालू करण्याचें नुकतेंच ठरविण्यांत आलें आहे. ह्या गाडीला फारशी वहातूक मिळेल अशी अपेक्षा नसली तरी सरहद्दीवरील प्रदेशांत विश्वास निर्माण करण्याच्या हेतूनें वरील निर्णय घेण्यांत आला आहे. गाडीबरोबरील रेल्वेचीं माणसें अँग्लो-इंडिअन व ख्रिश्चन जातीचीं ठेवण्यांत येतील.

**जपानचा कापडाचा धंदा**—लंडनमध्यें जमलेल्या अमेरिकन व ब्रिटिश तज्ञांनीं जपानी कापडाच्या धंद्यांत ३५ लाख चात्या असाव्यात असा निर्णय घेतला आहे. युद्धापूर्वी जपानमध्यें १ कोटी, १६ लाख चात्या होत्या. जपानच्या कापडाला पौंडाच्या कक्षेंतील देशांतून बाजार पेठ देण्याविषयींही चर्चा करण्यांत आली. जपानी कापडाच्या निर्यातीमुळें त्या देशाच्या अर्थव्यवस्थेला चांगली मदत होईल.

**सहकारी शेतीचा प्रयोग**—पश्चिम पाकिस्तानमधून आलेल्या ४०० निर्वासितांना अलवार संस्थानांतील ४ हजार एकर जमीन सहकारी शेतीसाठी हिंदुस्थान सरकारनें दिली आहे. ह्या चारशें कुटुंबांनीं सहकारी शेतीची एक योजना आखली असून प्रत्यक्ष कार्याला मे पासून प्रारंभ होईल. सहकारी शेतीचा हा पहिलाच मोठा प्रयोग आहे.

**हिंदुस्थानसाठीं इजिप्तचा तांदूळ**—हिंदुस्थानला अर्जेंटायनाकडून मिळणारा २३,००० टन मका इजिप्तला देऊन त्याच्या बदला इजिप्तकडून २६,००० टन तांदूळ घेण्याचें हिंद सरकारनें ठरविलें होतें. त्याप्रमाणें अलेक्झांड्रीआ येथील १०,००० टन तांदूळ हिंदुस्थानांत नुकताच आला आहे. इजिप्तकडून हिंदुस्थानला एकूण ४६,००० टन तांदूळ मिळणार आहे असें समजतें.

**यंत्रविशारदांची जरूरी**—१९४६ सालीं हिंदुस्थानांत जी नवीन भांडवलाची उभारणी झाली ती लक्षांत घेतां हिंदुस्थानच्या कारखान्यांतून १,१६८ यंत्रविशारदांची आणि ४,०५३ यंत्र-कुशल कामगारांची जरूरी आहे असा अंदाज आहे. तथापि हिंदी विशारदांऐवजीं परकीय तज्ञच नोकरीस ठेवण्याचा कल कारखानदारांतून दिसून येतो अशी तक्रार आहे.

**बँकांच्या सोयीसाठीं सुट्या**— बँकांचे सहामाही व वार्षिक हिशेब तयार करण्यास वेळ मिळावा म्हणून मुंबई सरकारनें ता. १ जुलै व ३१ डिसेंबर ह्या दोन दिवशीं बँकांसाठीं सुट्या जाहीर केल्या आहेत. ह्या सुट्या, मुंबई, पुणें, अहमदाबाद, नाशिक, देवळाली, सुरत, भडोच, सोलापूर, नडिआड, गोध्रा ह्या गांवांतील बँकांपुरत्या आहेत.

**पुन्हा एकदां अॅटम बाँबचा प्रयोग**—पॅसिफिक महासागरांतील मार्शल द्वीपसमूहांत अमेरिकेनें पुन्हां एकदां अॅटम बाँबच्या स्फोटाचा प्रयोग करून पाहिला. ह्या प्रयोगाची तारीख आणि प्रयोगांत वापरण्यांत आलेलें अणुस्फोटक शस्त्र ह्यासंबंधीं अत्यंत गुप्तता राखण्यांत आली आहे. बिकिनी बेटावर झालेल्या अणुस्फोटकाच्या वेळीं मात्र खूपच गाजावाजा करण्यांत आला होता.

# अर्थ

बुधवार, ता. १८ एप्रिल १९४८





प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## खनिज तेलाचें जागतिक राजकारण व हिंदुस्थान

चालू शतकाच्या सुरवातीपासून मोटारींच्या वहातुकीमुळें पेट्रोलचें महत्त्व वाढत गेलें. पहिल्या महायुद्धापासून विमानांचा उपयोग व नंतर वैमानिक वहातुकीची दुसऱ्या महायुद्धांतील विशेष वाढ, त्याचबरोबर आगबोटी व जमिनीवर चालणाऱ्या यंत्रांमध्यें जळण म्हणून खनिज तेलाचा उपयोग व सर्वसाधारण दिवाबत्तीसाठी रॉकेलचा वाढता उपयोग इ. सर्व कारणांमुळें नागरी जीवन, औद्योगिक जीवन व युद्धकालीन जीवन ह्या तिहेरी स्वरूपांत खनिज तेलाचें महत्त्व गेल्या २५ वर्षांत विशेष वाढलें आहे. ज्या देशाच्या हातांत तेलाच्या पुरवठ्याची मालकी असेल तो देश युद्धहि जिंकूं शकतो व स्वतःचें औद्योगिक जीवन भरभराटीस आणूं शकतो असा अनुभव येत आहे. खनिज तेलाच्या मालकी हक्कासाठी जागतिक राजकारण लढविलें जातें ह्याचा अनुभव विशेषतः मध्यपूर्वेकडील व अतिपूर्वेकडील परिस्थितीवरून गेल्या पाव शतकांत आला आहे. खनिज तेलाच्या खाणी यू. एस. ए., दक्षिण अमेरिका, कॅरिबिअन समुद्राच्या आसपासचा प्रदेश, कॅनडा, रशिया, युरोप, मध्यपूर्व, अतिपूर्व ह्या विभागांत पसरलेल्या आहेत; म्हणजे त्यांची विभागणी आफ्रिका सोडून बहुतेक प्रत्येक खंडांत झालेली आहे. परंतु मालकी हक्काच्या दृष्टीनें मात्र अमेरिका, इंग्लंड व हॉलंड, आणि रशिया ह्याच मुख्य देशांमध्यें जागतिक खनिज तेलाच्या खाणींची मालकी विभागली गेली आहे. ह्यावरून तेलाच्या मालकी हक्कामागें असलेल्या आर्थिक राजकारणाची कल्पना करतां येईल. मध्यपूर्व व अतिपूर्व येथील तेलाची मालकी विशेषतः इंग्लंड, हॉलंड, अमेरिका ह्या देशांकडे आहे. अर्थात ही मालकी शास्त्रीय ज्ञान आणि औद्योगिक व राजकारणांतील वर्चस्व ह्या गोष्टींमुळें शक्य झाली आहे.

हिंदुस्थानच्या तेलाच्या खाणी आसाम व पंजाब प्रांतांत आहेत. खनिज तेलाच्या विहिरींची मालकी इंग्लिश कंपन्यांकडेच आहे. फाळणीमुळें २० टक्के उत्पादन पाकिस्तानच्या हद्दींत गेलें आहे; व हिंदमध्यें बाकी ८० टक्के उत्पादन आहे. महायुद्धाच्या काळांत अखंड हिंदुस्थानचें खनिज तेलाचें उत्पादन ८७० लक्ष गॅलन्स पासून १९४४ सालीं ९७० लक्ष गॅलन्स पर्यंत वाढलें व नंतर तें थोडेसें घटलें. आपल्या गरजेच्या मानानें सुमारें ७ टक्के उत्पादन देशांत होतें व बाकीच्या ९३ टक्के तेलाची युद्धपूर्व काळांत ब्रह्मदेश, अमेरिका, रशिया, इराण, बोर्नियो, सुमात्रा इ. देशांतून आयात होत असे. परंतु युद्धकाळांत व नंतर तेलाची बहुतेक आयात इराण व बहारिन बेटें येथून होते. विशेषतः युद्धकाळांत व नंतर अमेरिकेकडून होणारी आयात जवळ जवळ नष्ट झाली आहे. परंतु अतिपूर्वेकडील तेलाची आयात ही परिणामीं अमेरिकन किंवा इंग्लिश मालकीचीच आहे. तेलाच्या जागतिक साठ्याच्या दृष्टीनें अमेरिका, मध्यपूर्व, दक्षिण अमेरिका व रशिया ह्यांची परिस्थिति सर्वांत समाधानकारक आहे. अगदीं अलिकडे दोनहि अमेरिका खंडांतील एकंदर उत्पादन ८१ टक्के असून त्यापैकीं अमेरिकन संयुक्त संस्थानांचेंच उत्पादन ६३ टक्के होतें. रशियाच्या तेलाच्या उत्पादनांत महायुद्धकालापासून हळु हळु घट होत आहे. १९४६ सालीं तर रशियाचें उत्पादन जागतिक उत्पादनाच्या फक्त ६ टक्के झालें. मध्य पूर्वेकडील तेलाचें उत्पादन अलिकडे निश्चितपणें वाढत असून, ह्या उत्पादनाची मक्तेगिरी विशेषतः अमेरिकन व इंग्लिश कंपन्यांकडेच आहे. तेलाच्या संभाव्य उत्पादनाच्या दृष्टीनें अमेरिकन संयुक्त संस्थानांच्या पेक्षांहि मध्यपूर्वेकडील देशांची परिस्थिति जास्त मजबूत आहे. ह्यामुळेंच कदाचित अमेरिकन राजकारणाचें क्षेत्र मध्यपूर्वेकडील देशांच्या बाबतींत अलिकडे विशेष सहानुभूतीचें झालें असावें.

हिंदुस्थानच्या दृष्टीनें विचार करतां, भावी काळांत वाढती हवाई वहातूक व मोटारींचें वाढतें दळणवळण ह्यामुळें आपली तेलाची मागणी वाढतच जाणार. परंतु ह्या मागणीसाठी कायमचें अमेरिका किंवा मध्यपूर्वेकडील देश यांवर अवलंबून राहाणें अपरिहार्य असलें तरी तें कितपत दूरदृष्टीचें ठरेल हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. पुढेंमागें ब्रह्मदेशाचें उत्पादन वाढूं शकेल व युद्ध-पूर्व काळाप्रमाणें ब्रह्मदेशांतून थोडीशी आयात होणें शक्य आहे. आपल्या देशाचा तांदूळ व लांकूड त्यांचीहि गरज पूर्वीप्रमाणेंच ब्रह्मदेशाकडून पुरविली जाणें शक्य आहे. उलट, हिंदला तयार कापड व इतर विक्री माल यांचा पुरवठा ब्रह्मदेशास करतां येईल. परराष्ट्रीय चलन मिळविण्याच्या दृष्टीनें अमेरिकन मालकीच्या तेलावर अवलंबून रहाणें श्रेयस्कर नव्हे. त्यापेक्षां हिंद व ब्रह्मदेश यांच्यामध्यें देवाण-घेवाण व्यापारी संबंध रहाणें जास्त फायद्याचें ठरणें शक्य दिसतें. यापुढें तेलाच्या बाबतींतलें परावलंबित्व इतर मार्गांनीं भरून काढण्याचे प्रयत्न करणें, परिणामी फायदेशीर ठरेल. आपल्याकडील दगडी कोळशाचें उत्पादन थोडेसें वाढवितां येणें शक्य आहे. परंतु दगडी कोळशाची वहातूक करणें जास्त खर्चाचें होतें. हिंदुस्थानला विजेचें उत्पादन जेथें विपुल पाणीपुरवठा किंवा उंचावरून खालीं पडणाऱ्या वाहात्या पाण्याचा फायदा घेण्यासारखी परिस्थिति आहे अशा सर्व ठिकाणीं (पंजाब, संयुक्त प्रांत, आसाम, दक्षिण हिंदुस्थान) वाढवितां येणें शक्य आहे. विजेच्या उत्पादनामुळें लहान लहान कारखाने चालवितां येतील. त्यामुळें तेलाच्या उपयोगांत किंचित काटकसर होईल. परंतु पॉवर अलकोहोलची निर्मिती सरकारी व खाजगी प्रयत्नांनीं वाढवितां आल्यास, पॉवर अलकोहोलचा उपयोग पेट्रोलमध्यें मिश्रणासाठी होऊं शकेल व आपलें तेलावरील परावलंबित्व कांहीं प्रमाणांत तरी कमी होईल. हिंद सरकारचें ह्या प्रश्नाकडे लक्ष वेधलें आहे व त्यासंबंधींचें बिल हिंद पार्लमेंटमध्यें मार्च अखेर पास झालें आहे. साखरेच्या कारखान्यांतून फुकट जाणाऱ्या काकवी किंवा मळीपासून यापुढें पॉवरअलकोहोल तयार करतां येईल, व त्याचें पेट्रोलमध्यें मिश्रण करून मोटारींसाठी वापरणें सक्तीचें केलें जाणार आहे. त्या बिलाची अंमलबजावणी झाल्यावर, खनिज तेलाच्या बाबतींतलें परावलंबित्व थोडें तरी दूर होईल. लहान गांवांत वीजपुरवठा हळु हळु करतां आल्यास रॉकेलच्या उपयोगांतहि काटकसर साधतां येईल.

## आगामी जबाबदाऱ्या पार पाडण्याची महाराष्ट्रीय कारखानदारांची तत्परता

### प्रातिनिधिक बैठकीमधील ठराव

दि. १७ व १८ रोजीं मराठा चेंबरच्या वतीनें पुणें येथें महाराष्ट्रीय कारखानदारांची एक प्रातिनिधिक बैठक चेंबरचे अध्यक्ष श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांच्या नेतृत्वाखाली भरली होती. महात्माजींचा अमानुष वध, सरकारचें औद्योगिक धोरण, महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांच्या वाढीच्या योजनेसाठी तज्ज्ञांची सल्लागार समिति नेमण्याची सरकारास सूचना, महाराष्ट्राकरितां स्वतंत्र इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना, दक्षिण महाराष्ट्रांतील दंगलींत नुकसान सोसलेल्या कारखान्यांची प्रवर्तकांच्या सहकार्यानें उभारणी करण्याची योजना आखण्यास सरकारास विनंति, कच्च्या-मालाचा नियंत्रित दरानें भरपूर पुरवठा, विलीन झालेल्या संस्थानांतील कारखान्यांच्या सवलती चालू ठेवण्याची आवश्यकता, वगैरे विषयांवर परिषदेनें ठराव केले.

उत्पादनवाढ, राष्ट्रीय मालकी, राष्ट्रीय नियंत्रण, मालक-कामगार संयुक्त समित्या, सरकारी नियोजनाचा कार्यक्रम, इत्यादि संबंधांतील महत्त्वाचा ठराव येथें उद्धृत केला आहेः—

### सहकार्याचें आश्वासन

( अ ) महाराष्ट्रीय कारखानदारांची ही परिषद दि. ६ एप्रिल १९४८ रोजीं हिंदी पार्लमेंटानें मंजूर केलेल्या औद्योगिक धोरणाचें मनःपूर्वक स्वागत करीत आहे. सदर धोरणाचा पाया राष्ट्रीय मालकी व राष्ट्रीय नियंत्रण हा आहे याची जाणीव परिषदेला असून त्यामुळें येणाऱ्या जबाबदाऱ्या महाराष्ट्रीय कारखानदार पार पाडतील व ते यशस्वी करण्याकरतां सरकाराशीं सहकार्य करतील असें ही परिषद् आश्वासन देत आहे.

### मालक-कामगार सहकार्य

( ब ) देशांतील उत्पादन गेलीं कांहीं वर्षे सतत घटत असून तें तसेंच घटत राहिल्यास देशांतील सांप्रतच्या आणीबाणीच्या परिस्थितीचें रूपांतर अत्यंत बिकट व गंभीर अरिष्टांत होईल. आंतरराष्ट्रीय परिस्थितिही अधिकाधिक नाजूक व भीतिजनक होत आहे. देशांतील कांहीं अंतर्गत प्रश्नहि चिंता उत्पन्न करीत आहेत. अशा वेळीं सर्वांगीण उत्पादन-वाढ हाच देशांत स्थैर्य व शांतता कायम राहण्याचा प्रभावी उपाय आहे. मध्यवर्ती सरकारला याची जाणीव असून त्यांनीं आपलें लक्ष उत्पादन-वाढीवर केंद्रित केलें आहे व त्यासाठी मालक-कामगार संबंधांत इष्ट सुधारणा घडवून आणण्याची योजना तयार केली आहे. सदर योजनेनुसार प्रत्येक कारखान्यांत मालक-कामगारांच्या संयुक्त समित्या स्थापन व्हावयाच्या आहेत. मालक-कामगार सहकार्याचा हा नवीन उपक्रम होत आहे. याचें यशापयश उभय पक्षांनीं समजूतदारपणा दाखवून कारखान्यांचा गाडा सुरळीतपणें चालवण्यावर अवलंबून आहे. कामगारांच्या प्रतिनिधींचें या समित्यांवरील स्थान व महत्त्व सरकारी ठरावांत सुचविल्याप्रमाणें योग्य तें ठेवण्याची ग्वाही महाराष्ट्रांतील कारखानदार, हे सरकार व कामगार यांस देत आहेत. मात्र, कारखानदारांच्या वतीनें असें आश्वासन देत असतां या नव्या समित्यांवरील आपली वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारी कामगारांचे प्रतिनिधी पार पाडतील अशी कारखानदारांची अर्थातच अपेक्षा आहे.

### कमिटीची नेमणूक

कामगारांचें वेतन व जीवन दर्जा सुधारण्याच्या उद्देशानें केल्या जाणाऱ्या योजनांचा साकल्यानें व तपशीलवार विचार करून त्या बाबतींत इष्ट त्या सूचना सरकारपुढें मांडण्याकरतां ही परिषद ( १ ) श्री. शं. वा. किर्लोस्कर ( अध्यक्ष ), ( २ ) श्री. दा. वा. पोतदार, ( ३ ) श्री. पु. का. द्विवेकर, ( ४ ) श्री. बाबुराव जेधे, ( ५ ) श्री. ग. रा. साठे, ( ६ ) श्री. रा. ब. चव्हाण, ( ७ ) श्री. बंडोपंत सुलाखे, ( ८ ) श्री. आ रा. भट ( कार्यवाह ) यांची समिति नेमीत आहे. या समितीला अधिक सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार देण्यांत येत आहे.

### कामगारांना ५०% हिस्सा

सरकारी औद्योगिक धोरणाच्या ठरावांत उल्लेखिल्याप्रमाणें कामगारांचें योग्य वेतन, गुंतविलेल्या सर्व भांडवलावर सतत करमाफ सहा टके नफा, व्यवस्थापकीय खर्च, सरकारी व इतर कराचा खर्च व कारखान्याची डागडुजी व वाढ याकरतां योग्य तो शिलकी निधी यांची तरतूद केल्यावर राहणाऱ्या नफ्याचा ५० टके हिस्सा कामगारांकरतां बाजूला काढण्यास व त्याचा विनियोग सरकार सुचवील त्या पद्धतीनें व योजनेनुसार करण्यास महाराष्ट्रीय कारखानदार सिद्धता दर्शवीत आहेत. उत्पादन-वाढीचें उद्दिष्ट कार्यक्षमतेनें साधण्यासाठी परदेशांतील यंत्रांच्या निर्मितीची यंत्रसामुग्री व साधनें आयात करण्यास व उद्योगधंद्यांची उत्पादन-शक्ति वाढण्याकरतां लागणारीं यंत्रें या देशांतच मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्याच्या योजनेला तसेंच नियंत्रित कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा, उत्पादनवाढीचे दृष्टीनें करण्यास सरकारनें आपल्या नियोजनाच्या कार्यक्रमांत अग्रस्थान देणें आवश्यक आहे.

### यांत्रिक शिक्षणाची तरतूद

राष्ट्रीय उत्पादन-वाढीकरतां औद्योगिक व यांत्रिक शिक्षण मिळालेल्या माणसांची अत्यंत आवश्यकता आहे. ती गरज तत्परतेनें भागवण्याच्या दृष्टीनें सरकार विश्वविद्यालयें व शिक्षण संस्था यांनीं उच्च, मध्यम, प्राथमिक प्रतीच्या यांत्रिक शिक्षणाची तरतूद अस्तित्वांत असणाऱ्या सर्व साधनसामुग्रीचा जास्तींत जास्त फायदा, त्यांत विद्यमान परिस्थितीमुळें अपरिहार्यतेनें भासणारा अपुरेपणा पत्करूनहि घेणें आवश्यक आहे असें या परिषदेचें मत आहे.

---

## श्री. गोपाळराव आपटे ह्यांची अभिनंदनीय नेमणूक

इंडियन बोर्ड ऑफ अकौन्टन्सीची पुनर्घटना करण्याचें काम हातीं घेण्यांत यावयाचें आहे. त्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक कमिटी नेमली आहे, तिचे एक सदस्य म्हणून पुणें येथील ऑडिटर श्री. गो. द. आपटे ह्यांची नेमणूक झाली आहे, असें समजतें. त्याबद्दल आम्हीं त्यांचें अभिनंदन करतों. श्री. गोपाळराव हे १९२१ सालीं बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले व १९२६ मध्यें त्यांनीं जी. डी. ए. ची परीक्षा दिली. १९३३ सालीं ते रजिस्टर्ड अकौंटंट झाले. १९४४ सालापासून त्यांना आर्टिकल्स भरणारे क्लार्क ठेवण्याची परवानगी मिळून त्यांच्या अकौन्टन्सी धंद्यांतील उच्च दर्जास मान्यता प्राप्त झाली आणि आतां तर अकौन्टन्सी धंद्याच्या देखरेखीचें काम करणाऱ्या स्वायत्त संस्थेची घटना बनविण्याची संधी त्यांस प्राप्त झाली आहे. शंभरावर कंपन्यांचे श्री. गोपाळराव हे ऑडिटर असून शेकडों सार्वजनिक संस्थांचे हिशेब ते विनामूल्य तपासून देऊन त्यांस हिशेबी दृष्टीचें मार्गदर्शन करीत आहेत. श्री. गोपाळरावांची नेमणूक मराठा चेंबरचे एक प्रतिनिधी ह्या नात्यानें होऊन ते हिंदुस्थानांतील चेंबर्सतर्फे कमिटीवर काम करणार आहेत. अशा रीतीनें मराठा चेंबर व श्री. आपटे ह्या दोघांच्याहि महत्त्वास दिल्लीनें मान्यता दिली आहे.

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें.

### जलशास्त्राचा वासंतिक वर्ग

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयामार्फत निरनिराळ्या प्रकारच्या शास्त्रीय व उद्योगधंदेविषयक ज्ञानाचें शिक्षण दिलें जातें. त्यांतच यंदा जलशास्त्रपारंगत श्री. न. गं. आपटे ह्यांचे नेतृत्वाखालीं वासंतिक वर्गाचा उपक्रम करण्याचें योजिलें आहे. मागील वर्षी श्री. आपटे यांनीं मुंबई सरकारचे शेतकी खात्यांतील विहिरींशीं संबंध येणाऱ्या सुमारें १०० नोकरांना या विषयाचें शिक्षण दिलें आहे.

हा वर्ग साधारणपणें १ महिना चालेल. वर्ग वैशाख शु॥ ३ अक्षय तृतीया ता. ११ मे १९४८ या दिवशीं सकाळीं सुरू होईल. अभ्यासक्रमाची फी रु. २५ आकारण्यांत येईल. हें शास्त्र शिकवीत असतांना भूशास्त्र, हवामानशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भूपृष्ठ, जलसंशोधनाच्या पद्धति, महाराष्ट्रांतील परिस्थिति, जमिनींतून पाणी कसें वाहतें आदिकरून विषयांची माहिती देण्यांत येणार आहे.

वर्गांत येणारांना इंग्रजी येत असावें व सर्वसाधारण ज्ञान मॅट्रिकपर्यंतचें असावें. या वर्गाचा उपयोग निरनिराळ्या सरकारी खात्यांतील विहिरींशीं संबंध येणाऱ्या नोकरांना, त्याचप्रमाणें खेडेगांवांत काम करणारांना, रूरल डेव्हलपमेंट, तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन, कोऑपरेटिव्ह सोसायटींतील नोकरवर्ग, सर्कल इन्स्पेक्टर वगैरेंना फारच होण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें खेडेगांवांत राहणाऱ्या शिक्षकांनाहि याचा सर्वसाधारण ज्ञान म्हणून बराच उपयोग होणार आहे.

याबाबतचा सर्व पत्रव्यवहार वर्गाचे मुख्याध्यापक श्री. न. गं. आपटे, जलशास्त्रपारंगत, पो. बॉ. नं. ५३३, पुणें २, या पत्त्यावर करावा.

### मुंबई प्रांतांत सिमेंटचा कारखाना

मुंबई प्रांतांत सिमेंटच्या कारखान्यांना उत्तेजन देण्याचा मुंबई सरकारचा विचार असून डेक्कन सिमेंट कंपनीचे डॉ. ए. जी. तेंडूलकर ह्यांच्या कांहीं योजनांना सरकारनें आपली मंजुरीही दिली आहे. विजापूर जिल्ह्यांत बागलकोट येथें वरील कंपनी एक सिमेंटचा कारखाना उभारणार आहे. ह्या कारखान्याचें वार्षिक उत्पादन १ लाख टन होईल असा अंदाज आहे. मुंबई सरकारनें पहिल्या पांच वर्षांपर्यंत कंपनीच्या भांडवलावर कमींत कमी ३ टक्के नफ्याची हमी देण्याचें ठरविलें आहे. कंपनीचें भांडवल १ कोटी रुपयांचें आहे. कंपनीच्या संचालक मंडळावर सरकारतर्फेचे ३ संचालक राहणार असून त्यांच्या करवीं कंपनीच्या व्यवहारावर सरकार देखरेख ठेवणार आहे. कंपनीचे हिशेब तपासण्यासाठीं आपला म्हणून एक खास हिशेब-तपासनीस नेमण्याचा अधिकार सरकार आपल्याकडे ठेवणार आहे. कंपनीच्या आर्थिक जबाबदाऱ्या व स्थैर्य ह्यासंबंधीं सरकारचे सर्व हुकूम कंपनीवर बंधनकारक रहाणार आहेत. सरकार जास्तींत जास्त १५ लाख रुपये रक्कम कंपनीला देणार आहे. भागीदारांना ३ टक्के नफा वांटल्यानंतर उरलेल्या नफ्यांतून सरकारची ही रक्कम परत करावयाची आहे. सरकारची सर्व रक्कम परत केल्यावर कंपनीच्या नफ्यांतील २५ टक्के नफा ५ वर्षेपर्यंत घेणें किंवा हमीची प्रत्यक्ष दिलेली रक्कम परत देण्यास लागणाऱ्या कालावधींत तीवर ३½ टक्के व्याज घेणें असे पर्याय ठेवण्यांत आले आहेत. पहिल्या पर्यायांत भागीदारांना ६ टक्के नफ्याचा अग्रहक्क ठेवण्यांत आला आहे.

## पीपल्स कॉमनवेल्थ को-ऑपरेटिव्ह कॉलनायझेशन सोसायटी लि.

२८१ सदाशिव पेठ, पुणें २.

## —अमृतनगर—

या योजनेच्या बाबतींत चौकशी करण्यासाठीं गेल्या महिन्यांत अनेक लोक येऊन गेले. त्यांच्यापैकीं योजनेला विरोध असणारी मंडळी सोडून दिली तरी बाकीच्यामध्यें तीन प्रकारच्या वृत्तीचे लोक आढळले.

१ – योजनेची व्यापकता पाहून दिपलेले व तिच्या यशाबद्दल साशंक असलेले,

२ – योजनेप्रमाणें कामें होऊन सर्व तयारी झाली म्हणजे आयत्या-वेळीं फायदा घेऊं इच्छिणारे.

३ – योजना यशस्वी करण्यासाठीं तिच्या उभारणीच्या आरंभापासून सोसायटीचे सभासद होऊन, डिपॉझिट ठेवून अगर आपली जमीन सोसायटीकडे योग्य खंडानें देऊन आपलेपणानें मदत करणारे,

या तिन्हींपैकीं पहिल्या वृत्तीच्या मंडळीकडे दुर्लक्ष करून योजनेचें काम पुढें जोरानें करीत राहणेंच इष्ट आहे.

पाकसिद्धीची वाट पाहून आयत्यावेळीं पानावर येऊन बसणारे व पाकसिद्धी चांगली व्हावी म्हणून आरंभापासून मदत करणारी मंडळी या दोघांनाही योजनेचे सारखेच फायदे मिळणें हें नैतिकदृष्ट्या अगदीं अयोग्य होणार आहे.

याला उपाय म्हणून पुढील व्यवस्था केली आहे :—

३१ मे १९४८ पर्यंत कॉलनायझेशन सोसायटीचे सभासद होऊन –

(अ) दरसाल दरशेंकडा तीन टक्के व्याजानें प्लॉटसाठीं अगर प्लॉट नको असल्यास तसेंच डिपॉझिट ठेवणारी मंडळी अगर

(आ) लँड ॲक्विझिशन कायद्याप्रमाणें सोसायटीला जमीनीचा कबजा मिळेपर्यंत आपली जमीन अमृतनगर योजनेंतील कामासाठीं योग्य भाड्यानें सोसायटीच्या स्वाधीन करून सहकार्य करणारे शेतकरी,

या दोघांनाही सहकारी तत्त्वाचें उल्लंघन कोणत्याही प्रकारें होऊं न देतां पुढील विशेष सवलती देण्यांत येतील.

१ – डिपॉझिट ठेवणारांना अगर जमीन सोसायटीच्या ताब्यांत देणाऱ्या शेतकऱ्यांना योजनेंत शहरवस्तीसाठीं मुकर केलेल्या जागांच्या सोसायटीकडून होणाऱ्या विक्रीवर दर चौरस फुटास एक पै याप्रमाणें उभारावयाच्या "सहाय्यक बोनस फंड" मधून डिपॉझिटच्या रकमेच्या अगर जमिनीच्या क्षेत्राच्या प्रमाणांत खास बोनस देण्याची व्यवस्था होईल. ही बोनसची रक्कम डिपॉझिटवर शेंकडा १२ टक्केपर्यंत अगर जमिनीच्या क्षेत्रावर एकरीं २५ रुपये अंदाजी होईल व ती मिळण्याचा काळ योजनेच्या प्रगतीवर अर्थात अवलंबून राहील. सर्वांनीं सहकार्य केल्यास तीन-चार वर्षांत ही रक्कम बोनस म्हणून देतां येईल.

२ – योजनेंत स्थापावयाच्या बाजारपेठेंतील प्लॉटस् ठरलेल्या शर्तींवर पहिल्याप्रथम वरील कलमांतील डिपॉझिटदारांचा व शेतकऱ्यांना डिपॉझिटच्या रकमेच्या अगर जमिनीच्या क्षेत्राच्या प्रमाणांत देऊं केले जातील.

— शेती व इतर मालाचें उत्पादन त्याचप्रमाणें मालाची वहातूक व देवघेव (घाऊक अगर फुटकळ) शक्य तितकी सहकारी पद्धतीनें व्हावी अशी जरी अपेक्षा असली तरी नफेबाजीसाठीं जनतेची अडवणूक करण्याचें धोरण नसलेल्या उत्साही तरुणांना त्यांच्या संशोधन बुद्धीला पूर्ण वाव मिळण्यासाठीं वरील उद्योग कांहीं प्रमाणांत स्वतंत्रपणें चालविण्याची संधि देण्यांत येईल. मात्र ही मंडळी वर दर्शविल्याप्रमाणें योजना यशस्वी करण्यासाठीं आरंभापासून सहकार्य करणारी पाहिजेत.

योजनेच्या क्षेत्रांत येणाऱ्या जमिनीची किंमत लँड ॲक्विझिशन कायद्याप्रमाणें सरकारकडून ठरविण्यांत येणार असल्यामुळें तिचा एकूण आंकडा अंदाजांत धरलेल्या आंकड्यापेक्षां किती कमीजास्त होईल हें आजच नक्की सांगतां येणार नाहीं. तो आंकडा बराच जास्त होऊं लागल्यास तो भागविण्यासाठीं वरील मुदतीनंतर होणाऱ्या सभासदांना प्लॉटची किंमत चौरस फुटास अर्धा आणा, एक आणा जास्त पडण्याचाही संभव आहे. १७–४–४८

शंकर रामचंद्र भागवत.

—सर्व प्रांतांतील—
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
दगडे बोळाजवळ,
पुणें २

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँ
क
लि.
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें | |
| व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००१ |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,११,८९० |
| खेळतें भांडवल | रु. ६६,५०,००० |

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
"बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे."

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

## वार्षिक ताळेबंद व रिपोर्ट

### दि यूनिअन बँक ऑफ कोल्हापूर, लि.

वरील बँकेच्या ताळेबंदांत देणें बाजूस १,२६,२५० रु. वसूल भांडवल, २९,००० रु. रिझर्व्ह फंड, ८,००० रु. बुडीत कर्ज फंड, २३,१०,२९५ रु. ठेवी असे प्रमुख आकडे आहेत. जिंदगीचे बाजूस ११,९१,१४१ रु. रोख व बँकांत, १,००,००० मनी अॅट कॉल, १,६६,८३१ रु. इन्व्हेस्टमेंट, ९,५७,९७१ रु. कर्जें, ९९,९९९ रु. बँकेची मालमत्ता असे आकडे दिसतात. बँकेनें १९४७ सालीं व्याज, कमिशन, इत्यादि द्वारां १,६३,८१० रु. मिळविले व ७५,३३६ रु. व्याज दिलें. ४४,४७१ रु. निव्वळ नफा उरला. म्हणजे, खेळत्या भांडवलावर सुमारें १·७% नफा पडला आहे. गेल्या वर्षी बँकेची सर्वांगीण वाढ झाली आहे. ९% डिव्हिडंड वाटणीस ११,२५० रु. लागले. १६,५०० रु. इन्कमटॅक्स व सुपरटॅक्ससाठी राखून ठेवले आहेत. बाकी बहुतेक सर्व नफा रिझर्व्ह व इतर फंडांत टाकण्यांत आला आहे. शेठ चुनीलाल एम. परमार हे बँकेचे चेअरमन असून श्री. जी. जी. श्रीखंडे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

### नवयुग चित्रपट लि., पुणें

वरील कंपनीनें १९४७ सालीं "मैं तेरा हूं" हें अपूर्ण चित्र पूर्ण केलें आणि 'फूल और कांटे' हें चित्र बहुतेक पुरें केलें. १९४८ मध्यें चित्रनिर्मितीचा वेग वाढविण्याचा कंपनीचा विचार आहे. कंपनीचा वर्षारंभ १ मे होता, तो आतां १ जानेवारी करण्यासाठी १ मे १९४७ ते ३१ डिसेंबर १९४७ अखेरचे हिशेब पुरे करण्यांत आले आहेत. ह्या आठ महिन्यांतील व्यवहारांत कंपनीस १६,०७२ रु. निव्वळ नफा झाला. बोर्डानें ठराव करून मुंबईच्या चार्टर्ड ऑर्किटेक्टाकरवीं कंपनीच्या इमारतीची किंमत करविली, ती ताळेबंदांतील मूळ किंमतीपेक्षा १,६५,३३५ रु. जास्त भरली. त्याचप्रमाणें मुंबईचे इंजिनिअर मि. टाटा ह्यांचे करवीं यंत्रसामुग्रीची किंमत करविली तीहि ६३,२६६ रुपयांनीं वाढली. अशा रीतीनें इमारत व यंत्रसामुग्रीच्या किंमतींत २,२८,६०१ रुपयांची भर पडली. त्यामुळें नफा-तोटा खात्यांतील तोट्याचा आकडा कमी होऊन तो आतां ८३,८०२ रु. एवढाच जिंदगीचे बाजूस राहिला आहे. रा. ब. एन. बी. देशमुख हे कंपनीचे अध्यक्ष असून श्री. सरदार जगन्नाथ महाराज हे उपाध्यक्ष आहेत. श्री. बापूसाहेब राजगुरु हे मॅनेजिंग डायरेक्टर आणि श्री. हरिभाऊ जोशी हे डायरेक्टर-इन-चार्ज आहेत. कंपनीची वार्षिक सभा ता. २८ एप्रिल रोजीं झाली.

### इंडस्ट्रिअल बँक लि., सांगली

(वार्षिक सभा: २ मे, १९४८)

वरील औद्योगिक बँकेच्या कामास १ ऑगस्ट, १९४६ रोजीं प्रारंभ झाला आणि तिचा पहिला ताळेबंद पांच महिन्यांचा १९४६ अखेरचा करण्यांत आला. त्यांत १,१०३ रु. तोटा होता. गेल्या वर्षांत बँकेचें खपलेलें भांडवल २,५३,००० रु. वरून ५,४८,००० रु. वर गेलें आणि खेळतें भांडवल १,१९,५९३ रुपयांचें ३,६८,७०३ रु. झालें. २,१२,५५० रु. च्या ठेवींत १५९,९०० रुपयांच्या मुदती ठेवी आहेत, हें विशेष नमूद करण्यासारखें आहे. औद्योगिक बँकेच्या यशास ही गोष्ट अत्यंत उपयुक्त अशीच आहे. सांगली दरबारनें २ लक्ष रुपयांचे भाग घेऊन व १ लक्ष रुपयांची मुदती ठेव ठेवून बँकेस सक्रिय पाठिंबा दिला आहे. बँकेनें २,४४,५७४ रु. चीं कर्जें दिलीं आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस ७१९ रु. नफा झाला, त्या रकमेनें शिलकी तोटा कमी होत आहे. श्री. माधव गोपाळ गाडगीळ हे बँकेचे चेअरमन असून श्री. महादेव अण्णाजी कुलकर्णी कुसनाळकर, बी. ए., एलएल. बी. हे सेक्रेटरी आहेत. बँकेचा डायरेक्टर बोर्ड अनुभवी असून श्री. शंकरराव किर्लोस्करांसारख्यांचेंहि मार्गदर्शन बँकेस लाभत आहे.

## हिंदुस्थान स्पन पाइप्स लि. च्या फॅक्टरीस

### पुनर्घटना मंत्री, श्री. पाटील, ह्यांची भेट

नामदार ल. मा. पाटील (पुनर्घटना मंत्री, मुंबई) यांच्या नगर जिल्ह्यांतील धावत्या भेटीमध्यें त्यांनीं अहमदनगर स्टेशनजवळ अरणगाव रोड येथें सध्या उभारणीचे काम चालू असलेल्या दि हिंदुस्थान स्पन पाइप्स लि. पुणें च्या सिमेंट पाइप्स तयार करण्याच्या दुसऱ्या फॅक्टरीस गुरुवार ता. १५।४।१९४८ रोजीं मुद्दाम भेट दिली. त्यावेळीं नगर जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष स्वामी सहजानंद, आमदार श्री. गरूड, आमदार श्री. रामभाऊ गिरमे व इतर प्रसिद्ध नागरीकही उपस्थित होते. पाहुणे मंडळीस कंपनीचे मॅनेजिंग एजन्टस पैकीं श्री. भा. ना. गोरे यांनीं भाषण करून कंपनीच्या स्थापनेपासून आतापर्यंतच्या प्रगतीची कल्पना करून दिल्यावर नामदार श्री. ल. मा. पाटील ह्यांचें उद्योगधंद्यांबाबत छोटेंसे परंतु अत्यंत उद्बोधक असें भाषण झालें. त्यावेळीं त्यांनीं कंपनीच्या आतापर्यंतच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करून अशा तऱ्हेच्या उत्पादनाची (सिमेंट कांक्रीट पाइप्स बनविणें) आपल्या प्रांतांत व विशेषतः नगर, सोलापूर, विजापूर वगैरे पाण्याची टंचाई असलेल्या भागास किती जरूरी आहे, हें सांगून कंपनीस सर्वत्रांनीं सर्वतोपरी सहाय्य करावें असें सांगितलें.

त्यानंतर कंपनीचे वतीनें, कंपनीचे नगर जिल्ह्यातर्फेचे डायरेक्टर आमदार श्री. रामभाऊ गिरमे यांनी पाहुणेमंडळींना हारतुरे समर्पण केल्यावर व अल्पसा फलाहार होऊन समारंभ संपला.

## औद्योगिक बँकांस सवलतींची आवश्यकता

### प्रेसिडेन्सी इं. बँकेचे चेअरमन, श्री. ग. रा साठे, ह्यांची सूचना

संपादक, "अर्थ" ह्यांस सा. न. वि. वि.

आपल्या "अर्थ" साप्ताहिकाच्या १४ एप्रिलच्या अंकांत "हिंदी औद्योगिक भांडवलविषयक विचार" हा लेख लिहून औद्योगिक बँका स्थापण्याची श्री. व. वि. लोणकर ह्यांनीं सूचना केली आहे, हें योग्यच आहे. त्याचबरोबर पुण्यांत असा प्रयोग करण्यांत येत असल्याचा उल्लेख त्या लेखांत करावयास पाहिजे होता, असें मला वाटतें. प्रामुख्यानें उद्योगधंद्यांस भांडवली मदत करण्याचे उद्देशानें निघालेल्या पुण्यांत सध्या दोन बँका (दि प्रेसिडेन्सी इं. बँक लि. व भारत इं. बँक लि. पुणें) असून पहिली शिड्यूल्ड बँक झाली आहे.

मुख्य अडचण आहे ती बँकिंगबाबतच्या सरकारी अकुंचित दृष्टीची आहे. नवीन येऊं घातलेलें बँकिंग बिल जसेच्या तसें पास झाल्यास औद्योगिक बँक, तिचें औद्योगिक स्वरूपच बदलल्याशिवाय, चालवणेंच अशक्य होणार आहे. तेव्हां श्री. लोणकरांसारख्या पुरोगामी अर्थतज्ञांनीं औद्योगिक बँकांस विशिष्ट सवलती दिल्या जाण्याबद्दल विशेष प्रचार करून सरकार व आमदार यांचेवर दडपण आणावयास पाहिजे. नुसतें औद्योगिक बँका पाहिजेत, एवढेंच म्हणण्यानें भागणार नाहीं असें मला वाटतें.

साठे बिस्किट कं., पुणें. २ — आपला, ग. रा. साठे.

### इन्स्टिट्यूटचे नवे एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या एक्झिक्यूटिव्ह ऑफिसरचे जागीं इंदूरचे श्री. ए.एस. शेलेंकर ह्यांची नेमणूक झाली आहे. त्यांनीं २२ एप्रिल ते २६ एप्रिलपर्यंत पुणें येथें मुक्काम करून सहकारी कॉलेज, सहकारी स्कूल, रजिस्ट्रार, डेप्युटि व असि. रजिस्ट्रार, प्रमुख सहकारी कार्यकर्ते, जिल्हा यूनियन बोर्ड, सहकारी ट्रेनिंग इन्स्पेक्टर, इत्यादींस भेटी दिल्या. ह्याचप्रमाणें ता. २७ व २८ रोजीं सातारा येथें आणि नंतर नगर येथें त्यांचे कार्यक्रम होऊन ३ मे रोजीं ते मुंबईस परततील.

### श्री. द. व. फाटक ह्यांचें भाषण

म. कारखानदार संघाची वार्षिक सभा महाराष्ट्र इ. म्युझियमच्या सभागृहांत रविवार, ता. २५ रोजीं भरली होती. श्री. दत्तोपंत फाटक ह्यांची अध्यक्षपदीं फेर निवडणूक झाली. त्यांनीं आपल्या भाषणांत, मालकवर्गानेंच कामगारांच्या अडचणी समजून घेऊन त्यांचें नेतृत्व स्वीकारावें आणि कारखान्यांत आपण शक्य तितके तज्ज्ञ कामगारच नेमावे, असें प्रतिपादन केलें. किमान पगार व महागाई रोजंद्या आणि हुशार मजुरास सारखीच द्यावी लागते; तेव्हां प्रथम महाग वाटणारी मजुरी परिणामीं किफायतशीरच ठरेल असें श्री. फाटक म्हणाले. किमान विशिष्ट दर्जाचें किमान काम, हाच किमान मजुरीचा पाया होऊं शकेल.

### कोळसा निघाला, तरी तो हलवला पाहिजे.

हिंदी रेल्वे खात्यानें कोळशाच्या धंद्यासाठी दररोज ३,१६७ वॅगन्स देण्याची योजना केली. परंतु, सरासरीनें दररोज फक्त २,८७५ वॅगन्स मिळूं शकल्या. त्यामुळें, खाणींतून निघालेला कोळसा पडून रहात आहे. ३१ जानेवारी अखेर अशा रीतीनें सुमारें २३ लक्ष टन कोळसा पडून होता; १९४७ च्या जानेवारी अखेर फक्त ७ लक्ष टनच कोळसा वहातुकीची वाट पहात होता. कारखान्यांची इकडे गैरसोय होऊन, खाणीवाल्याचें ३ कोटी रु. भांडवल कोळसा न हालल्यामुळें निष्कारण गुंतून पडलें आहे.

### बचत योजना सभा

ता. ५–४–४८ रोजीं कोर्टी (ता. पंढरपूर) श्री महादेव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची सर्वसाधारण सभा भरली होती. प्रथम श्री. साळुंके, बँक इन्स्पेक्टर, पंढरपूर यांनीं बचत योजनेचें चालू परिस्थितींतील महत्त्व, त्यापासून होणारे फायदे व सोसायटीचे सभासदांनीं बचत योजनेनुसार ठेवी ठेवून सोसायटीचें व आपलें हित कसें साधावें हें सांगितलें. नंतर मे. देशमुख, को. ट्रेनिंग इन्स्पेक्टर, सोलापूर, यांनींही याबाबत माहिती सांगितली. नंतर प्रत्येक सभासदानें चालूं हंगामांत रु. २० प्रमाणें ठेव ठेवणेचें एकमतानें ठरलें.

### ऑडिटरांच्या हितसंवर्धनासाठी कंपनीकायद्यांत सुधारणा

इंडियन कंपनीज ॲक्टांत ऑडिटरांच्या व्यवसायाच्या दृष्टीनें सुधारणा सुचविण्याकरितां इंडियन अकौंटन्सी बोर्डानें एक तज्ज्ञांची कमिटी नेमली आहे. तिचेमध्यें सर शापुरजी बिलिमोरिया, श्री. एस. सूर्य नारायण अय्यर, श्री. बर्डी, श्री. दत्त व श्री. खन्ना हे आहेत.

### सोन्याच्या जागतिक उत्पादनांत वाढ

| वर्ष | औंस |
|---|---|
| १९४६ | २,३५,००,००० |
| १९४७ | २,३६,५०,००० |


नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था
दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २
—आमचीं वैशिष्ट्यें—
( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.
विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.
—मॅनेजिंग डायरेक्टर

दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०
हेड ऑफिसः—पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल … … | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल … | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल … | रु. ३,९६,१४५ |
| एकूण खेळतें भांडवल … | रु. ५५ लाखांवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साठ्येकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
प्र. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.